महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १७ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी



## पाळीव प्राण्यांसाठी गॅस शवदाहिनीचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात पाळीव प्राण्यांसाठी गॅसवर आधारित पहिली शवदाहिनी सुरू झाल्याने प्राणीप्रेमींची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे. बाळकुम अग्निशमन केंद्रामागील माजिवडा गाव परिसरात या अत्याधुनिक गॅसदाहिनीचे लोकार्पण शनिवारी सकाळी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सरनाईक म्हणाले की, ठाणे शहरात पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी असावी, अशी विनंती मी तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली होती. त्यानुसार माजिवडा गावातील स्मशानभूमी शेजारी स्वतंत्र प्राणीस्मशानभूमी उभारण्यात आली आहे. या स्मशानभूमीचा प्रवेशद्वार वेगळा असून प्राणीप्रेमींची वर्षानुवर्षांची मागणी आज पूर्ण झाली आहे. कार्यक्रमाला माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, कार्यकारी अभियंता संजय कदम, वैद्यकीय अधिकारी डॉ. योगिता धायगुडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर, बी. व्ही. अभियंता गव्हाणे व प्राणी मित्र संघटनेच्या सोनाली सजननी आदी मान्यवर उपस्थित होते.

## भिवंडीतील शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात बियाणे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा, ता. १६ :** रब्बी हंगामासाठी भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात हरभरा बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. कडधान्य क्षेत्र विकास योजनेअंतर्गत पीक प्रात्यक्षिकासाठी हरभरा पिकाचे 'फुले विक्रांत' वाण उपलब्ध झाले आहे. हे बियाणे मे. रमेश ॲग्रो कृषी सेवा केंद्र, भिवंडी येथे मिळणार आहे. हरभऱ्याची पेरणी करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी २० किलो बियाणे देण्यात येणार आहे.

या बियाण्यांवर ४५ टक्के शासकीय अनुदान मिळणार असून ५५ टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरायची आहे. २० किलो प्रति बॅग बियाण्यांची बाजारभावानुसार किंमत २३०० रुपये आहे. त्यावर ४५ टक्के म्हणजे १०४० रुपये अनुदान मिळणार असून, शेतकऱ्यांना १२६० रुपये भरून बियाण्याची बॅग मिळेल. बियाणे सुट्टे मिळणार नाहीत; फक्त २० किलोच्या बॅगमध्येच उपलब्ध असतील. मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन ३१८/३,४ गोविंद निवास, नझराना कम्पाउंड, भिवंडी येथे हरभरा पिकाचे बियाणे सकाळी ९ ते सायं ७ वाजेपर्यंत उपलब्ध होतील. शेतकऱ्यांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन भिवंडी कृषी विभागाने केले आहे.

## कल्याणमध्ये एकदिवसीय ठाणे जिल्हा साहित्य संमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व १६२ वर्षे अविरत वाचन सेवा देणारे सार्वजनिक वाचनालय कल्याण यांच्या अनुदानातून एकदिवसीय ठाणे जिल्हा साहित्य संमेलन रविवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायं ६ या वेळेत महावीर हॉल, छत्रपती शिवाजी महाराज चौक कल्याण (प.) येथे संपन्न होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक अशोक नायगावकर यांच्या हस्ते होणार असून समेंलनाध्यक्ष पद ज्येष्ठ साहित्यिक संजय जोशी भूषविणार आहेत. संमेलनाचा शुभारंभ ग्रंथदिंडीने होणार असून साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड यांची थेट भेट मुलाखतकार विद्या प्रभू (को.म.सा.प.मुंबई) घेणार आहेत. नव पिढीचे साहित्यिक – परिसंवाद या कार्यक्रमात कवी प्रथमेश पाठक, प्रकाशक संजय शिंदे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त विशाखा गढरी आदि.सहभाग घेणार आहेत. माझी माऊली मराठी-चर्चात्मक कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक अशोक बागवे, गझल संध्या कार्यक्रमात ज्येष्ठ गझलकार आप्पा ठाकूर, ज्येष्ठ गझलकार ममता सपकाळ सहभागी होणार आहेत. तसेच ठाणे जिल्हयातील मान्यवर साहित्यिकांचा सन्मान सोहळा, ग्रंथ प्रदर्शन व विक्री इ. संपन्न होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष मिलिंद कुलकर्णी (अध्यक्ष, सा.वा.क.) यांनी दिली. कल्याणवासियांनी या साहित्यिक मेजवानीचा लाभ मोठ्यासंख्येने घ्यावा असे आवाहन सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी केले आहे.

आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस...

# ठाणे- बदलापूर- उरण- पेण उमेदवारांची अर्ज भरण्यासाठी गर्दी





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, बदलापूर, उरण आणि पेण नगरपरिषद/महापालिका निवडणुकांची रंगत सुरू झाली आहे. विविध पक्षांकडून उमेदवारी अर्जांची मोठी संख्या दाखल होत असून अनेक ठिकाणी थेट नेत्यांमधील द्वंद्व, आघाड्यांचे सामर्थ्य प्रदर्शन आणि नवीन चेहऱ्यांची एन्ट्री यामुळे या निवडणुकांच्या लढती अधिक रोचक बनल्या आहेत.**

### ■ ऋता आव्हाड यांची राजकारणात एन्ट्री

**ठाणे :** आगामी ठाणे महापालिका निवडणुकीत शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड यांनी प्रभाग क्रमांक २३ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांच्या नावाने राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. हा प्रभाग माजी नगरसेवक व आव्हाड यांचे माजी जवळचे सहकारी असलेल्या, सध्या शिंदे सेनेत गेलेल्या मिलिंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली आहे. त्यामुळे आव्हाड-पाटील आमनेसामने येणार असल्याने लढत चुरशीची ठरणार आहे. ठाण्यात आतापर्यंत शरद पवार गटाकडे ७३ अर्ज दाखल झाले असून पात्र उमेदवारांची यादी लवकरच जाहीर केली जाणार आहे.

### ■ भावना घाणेकरांचा अर्ज दाखल

**उरण :** उरण नगरपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडी, शेकाप आणि मनसे एकत्र येत असल्याचे संकेत मिळाले असून नगराध्यक्ष पदासाठी भावना घाणेकर यांनी भव्य मिरवणुकीत अर्ज दाखल केला. उरणचे आमदार महेश बालदी यांच्या बालेकिल्ल्यात या आघाडीने उभी केलेली लढत रंगतदार ठरणार आहे. २१ उमेदवारांनीही अर्ज दाखल केले.

### ■ पेणमध्ये १५ उमेदवारी अर्ज दाखल

**पेण :** निवडणुकीत शनिवारी एकूण १५ उमेदवारी अर्ज दाखल झाले. नगरविकास आघाडीने माजी नगराध्यक्ष संतोष श्रृंगारपुरे यांच्या नेतृत्वाखाली पाच उमेदवारांसह पेण नगरपालिका दमदार ताकद दाखवली. यापूर्वी ६ अर्ज दाखल झाले होते. महायुती तुटण्याची चिन्हे, तर महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदही स्पष्ट होत असल्याने पेणमधील निवडणूक यंदा अधिक चुरशीची होणार आहे.

### ■ बदलापुरात एकाच दिवशी ११ उमेदवारी अर्ज

**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगरपरिषद निवडणुकीत पहिल्या चार दिवसांत एकही अर्ज न आल्यानंतर पाचव्या दिवशी तब्बल ११ अर्ज दाखल झाले. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक अरुण सुरवळ हे यंदाच्या निवडणुकीतील पहिले अर्जदार ठरले. शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादीकडून अनेक इच्छुकांनी अर्ज दाखल करत स्पर्धा वाढवली आहे. सोमवार अर्जाचा शेवटचा दिवस असून रविवारीही अर्ज दाखल करता येणार असल्याने पुढील दोन दिवसांत अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

### ■ प्रियांका दामले यांना अधिकृत उमेदवारी

प्रभाग क्रमांक ६-अ साठी महायुतीतर्फे प्रियांका आशिष दामले यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली. राष्ट्रवादी (शरद पवार), भाजप आणि RPI यांच्या आघाडीकडून दिलेल्या बी-फॉर्मसह दामले निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. संघटन बांधणी, सामाजिक उपक्रम आणि स्थानिक संपर्कामुळे त्यांची लोकप्रियता वाढल्याचे पक्षनेत्यांनी सांगितले.

# शिवसेना विधानसभा सहसंपर्क प्रमुख विजय जोशी यांचा भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : कल्याण डोंबिवलीतील राजकीय वातावरण चांगलेच तापत असून कल्याण पूर्वेत शिवसेना शिंदे गटाला भाजपने जोरदार झटका दिला आहे. शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा सहसंपर्क प्रमुख विजय जोशी यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याहस्ते भाजपात प्रवेश केला आहे. त्यासोबतच ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका शीतल मंढारी आणि सामाजिक कार्यकर्ते केतन रोकडे यांनी देखील भाजपात प्रवेश केला आहे. कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांच्या नेतृत्वात कल्याण पूर्वेत हा प्रवेश सोहळा पार पडला. गावाचा विकास डोळ्यासमोर ठेऊन भाजपामध्ये प्रवेश केला असल्याची प्रतिक्रिया विजय जोशी यांनी दिली.**



गेले काही दिवस कल्याण लोकसभा क्षेत्रातील कार्यकर्ते, विविध पक्षांचे कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा महाराष्ट्र विकासाच्या दिशेने न्यायचं असेल तर चांगल्या सहकाऱ्यांशीवय शक्य नाही. विजय जोशी यांच्या सारखे चांगले कार्यकर्ते आधी पासून मित्र म्हणून जोडलें आहे. मित्र म्हणून मी काय करू शकतो हे सर्व महाराष्ट्रला माहिती आहे. भाजप विजय जोशी यांच्या पाठी 200 टक्के उभी राहणार असल्याचे यावेळी भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. आज आमदार सुलभा गायकवाड यांच्या जनसंपर्क कार्यालयात पार पडलेल्या भव्य पक्ष प्रवेश सोहळ्यात शिवसेनेचे विजय जोशी, विकी जोशी, माजी नगरसेविका शीतल मंढारी, केतन रोकडे, स्नेहल रोकडे, प्रल्हाद शेळके यांनी आपल्या शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी परिवारात जाहीर प्रवेश करून संघटनेला नवी ऊर्जा आणि बळ दिले आहे. या प्रसंगी माजी आमदार नरेंद्र पवार, जिल्हा निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी, भा.ज.यू.मो. जिल्हाध्यक्ष वैभव गायकवाड, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, मनोज राय, रितेश खराटे, विकी तरे, हेमलता पावशे, इंदिरा तरे, मंडळ अध्यक्ष संतोष शेलार, विजय उपाध्याय, अमित गायकवाड, प्रज्वल खैरनार, यशोदा माळी, वंदना मोरे, राखी बारोद तसेच अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरांच्या जलद, पारदर्शक व नियोजीत विकासासाठी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या KD SWIFT प्रणालीचा शुभारंभ !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**महापालिकेच्या KD SWIFT या प्रणालीचा शुभारंभ आज करण्यात आला. शहराचा विकास जलद गतीने पारदर्शक व नियोजीत पध्दतीने होण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करीत असल्याची, माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली. सदर कार्यक्रम महापालिका अधिकारी वास्तुविशारद, MCHI अध्यक्ष व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्रात अशा प्रकारे प्रथमच KD SWIFT म्हणजेच SINGLE WINDOWS INTEGRATED FACILITATION TOOL ही प्रणाली विकसित केली आहे**



या अंतर्गत BUILDING PERMISSION MANAGEMENT SYSTEM बरोबरच सर्व प्रकारचे "नाहरकत दाखले" म्हणजेच अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला, पाणी पुरवठा विभागाचा नाहरकत दाखला, जनि:/मनि: विभागाचा नाहरकत दाखला, उद्यान विभागाचा नाहरकत दाखला, कर विभागाचा नाहरकत दाखला इ. एक खिडकी योजना या प्रणालीद्वारे उपलब्ध होतील. तसेच या प्रणालीमध्ये DASHBOARD च्या माध्यमातून नागरीकांना आणि विकासकांना आपल्या अर्जाचे REAL TIME TRACKING करता येणार आहे. त्यामुळे ही प्रणाली विकासकांसह, नागरीकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. महापालिकेतील विविध प्रकारच्या विकास परवानग्या करीता शासनाने BPMS प्रणाली विकसित केलेली आहे. मात्र याकरीता आवश्यक "ना हरकत दाखले" हे विहीत कालावधीत तसेच एकाच PLATFORM वरुन कसे देता येतील, या अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे संकल्पनेतून ही प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. याकरीता शासनाचे BPMS विभागाने केलेले सहकार्य तसेच यासाठी वास्तुविशारद, MCHI तसेच महापालिका नगररचना विभागाचे सहा.संचालक नगररचना संतोष डोईफोडे, नगररचनाकार सुरेंद्र टेंगळे तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाचे उपआयुक्त समिर भुमकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या नविन प्रणालीमुळे कोणत्याही नाहरकत दाखल्यासाठी व्यक्तीश: महापालिकेत जाण्याची आवश्यकता भासणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाला ठरावीक कालमर्यादेत अर्जावर निर्णय देणे बंधनकारक करण्यात आले आहे. बनावट कागदपत्रांना आळा घालण्यासाठी प्रत्येक प्रमाणपत्रावर अधिकृत QR CODE देण्यात येणार आहे. त्याची सत्यता तात्काळ तपासता येईल. अर्ज दाखल केल्यानंतर 28 दिवसांत नागरीकांना आवश्यक परवानग्या प्राप्त होऊ शकतील. BPMS आणि SWIFT या दोन्ही प्रणाली यशस्वीरित्या राबविणारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिलीच महापालिका ठरणार आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले. जास्तीत जास्त नागरीकांनी या प्रणालीचा वापर करुन, महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर रचना विभागाचे सहाय्यक संचालक संतोष डोईफोडे यांनी केले.



कुळगांव-बदलापूर नगराध्यक्षपदासाठी

## रुचिता घोरपडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी

**बदलापूर :** भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय (आठवले गट) युतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत लोकप्रिय उमेदवार सौ.रुचिता राजेंद्र घोरपडे यांनी आज उत्साहपूर्ण वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याचबरोबर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय (आठवले गट) युतीच्या अनेक उमेदवारांनीही आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले.

याप्रसंगी उपस्थित हजारो समर्थक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या जल्लोषातून युतीच्या उमेदवारांविषयीचा जनतेचा अपार विश्वास स्पष्टपणे जाणवत होता. नागरिकांच्या उत्कट सहभागामुळे या निवडणुकीत युतीचा प्रचंड विजय निश्चित असल्याचा विश्वास वाटतो.

यावेळी माजी मंत्री श्री.कपिल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅ.आशिष दामले, भारतीय जनता पार्टी ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. जितेंद्र डाकी आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

नगरपरिषद क्षेत्रातील विकासाचे सातत्य कायम ठेवत सर्व समाजघटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करण्याचा आमचा निर्धार आहे. कुळगाव-बदलापूरच्या नागरिकांनी या युतीच्या उमेदवारांना अभूतपूर्व पाठिंबा देऊन प्रगतीच्या वाटचालीला गती द्यावी, असे आवाहन करीत आहे.

अंबरनाथ नगराध्यक्ष निवडणुकीत

## शिंदेसेनेचे समीकरण बिघडणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगराध्यक्ष निवडणुकीत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत चुरस वाढत असतानाच महाविकास आघाडीकडून मात्र अद्याप स्पष्ट रणनीती समोर आलेली नाही. मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 'बदलापूर म्हात्रे पॅटर्न' अंबरनाथमध्ये राबविण्याच्या तयारीत असल्याचे राजकीय वर्तुळात संकेत आहेत. यामुळे शिंदेंच्या शिवसेनेचे समीकरण बिघडण्याची शक्यता अधिक मानली जात आहे. आघाडीतील काँग्रेस शहराध्यक्ष प्रदीप पाटील यांच्या पत्नी नूतन पाटील यांचे नाव आघाडीच्या उमेदवारीसाठी जोरदार चर्चेत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या आग्रहामुळे त्यांच्या उमेदवारीचा 'मशाल' चिन्हावर गंभीरपणे विचार सुरू असल्याचे समजते. महाविकास आघाडी मनसे एकत्र येण्याची चर्चा असली तरी अधिकृत घोषणा न झाल्याने उमेदवारीचा तिढा कायम आहे. दोन्ही राष्ट्रवादी तसेच इतर घटक पक्षांकडे ठोस चेहरा नसल्याने काँग्रेसचाच पर्याय अधिक सक्षम मानला जात आहे.

शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांची

## निवडणूक आरक्षण सोडतीवर हरकत


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १६ (वार्ताहर): कल्याण डोंबिवली महापालिकेने काही दिवसांपूर्वी सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर केली. या आरक्षण प्रक्रियेवर आता शिवसेना शिंदे गटाने हरकत घेतली आहे. कल्याण पश्चिम शिवसेना शहरप्रमुख रवि पाटील यांनी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. रवि पाटील यांनी महापालिका निवडणूक आरक्षण सोडतीमध्ये प्रभाग क्रमांक ३, ५ आणि प्रभाग क्रमांक १५ वर अन्याय झाल्याचे म्हटले आहे. या आरक्षण सोडतीवर आक्षेप घेत या तिन्ही प्रभागांमध्ये आरक्षणाची रचना समाजातील सर्व घटकांना न्याय देणारी नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**

प्रभाग क्रमांक ३, ५ आणि १५ मध्ये आरक्षणाचे वितरण एससी, एसटी, ओबीसी आणि सर्वसाधारण घटकांमध्ये पुरेशा प्रमाणात न्याय देणारे नसून, त्यात अनुचित असमानता आढळत असल्याचा पाटील यांनी आरोप केला आहे. सर्व प्रभागांमध्ये आरक्षणाचे योग्य संतुलन न राखल्याने काही घटकांना प्रतिनिधत्व मिळणार नाही, असेही त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भात पाटील यांनी आयुक्त अभिनव गोयल आणि निवडणूक आयुक्त यांच्याकडे आरक्षणातील त्रुटी दूर करून सर्व समाजघटकांना न्याय देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात आरक्षणातील पुनर्विलोकन करून असमानता तातडीने दूर न झाल्यास याप्रकरणी कायदेशीर मार्ग अवलंबण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**प्रभाग क्रमांक ३ मध्ये अ-अनु. जाती, ब-अनु. जमाती महिलांसाठी क-नागरिकांचा मागास प्रवर्ग, ड-सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५मध्ये अ-अनु. जाती, ब-अनु. जमाती, क-नागरिकांचा मागास प्रवर्ग, ड-सर्वसाधारण महिला आणि प्रभाग क्रमांक १५मध्ये अ-अनु. जाती महिला ब-अनु. जमाती महिला, क-नागरिकांचा मागास प्रवर्ग ड-सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे.**

## वाचक मनोगत



# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली.

१९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल.

मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते.

बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना

**विनम्र अभिवादन!**

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## संपादकीय

# वाहतूक कोंडी – एक भीषण समस्या!

शहरांचा विकास आणि लोकसंख्या वाढ यांचा परिणाम म्हणून वाहतूक कोंडी ही आजची सर्वात ज्वलंत आणि त्रासदायक समस्या बनली आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या, अरुंद रस्ते, चुकीचे पार्किंग आणि वाहतूक नियमांचा बेफिकीर भंग यामुळे शहरांची गति मंदावली आहे. ही केवळ अडचण नाही, तर आर्थिक, सामाजिक आणि मानसिक पातळीवर हानी करणारी भीषण समस्या आहे. वाहतूक कोंडीमुळे सर्वात मोठा परिणाम होतो तो साध्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर. ऑफिसला जाणे, रुग्णवाहिकेला मार्ग न मिळणे, शाळेची बस वेळेवर न पोहोचणे – या प्रत्येक गोष्टींवर कोंडीचा थेट परिणाम दिसतो. तासन्तास ट्रॅफिकमध्ये अडकून लोक मानसिक तणावाला बळी पडतात. वेळ आणि इंधन वाया जाणे हा तर रोजचा भाग झाला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेतही यामुळे मोठे नुकसान होते. शहर नियोजनातील त्रुटीही तेवढ्याच जबाबदार आहेत. नवीन रस्ते, उड्डाणपूल, सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार हे निर्णय ज्या वेगाने घ्यायला हवेत, तेवढ्या तत्परतेने घेतले जात नाहीत. दुसरीकडे नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन न करणे, चुकीचे पार्किंग, बेफिकीर वाहनचालक – यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनते. आज गरज आहे ती समन्वयाने उपाययोजना करण्याची. एकीकडे शासनाने आधुनिक सार्वजनिक वाहतूक, ट्रॅफिक सिग्नल व्यवस्थापन, पार्किंग धोरण, स्मार्ट रोड प्लॅनिंग याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. तर दुसरीकडे नागरिकांनीही जबाबदार वाहनचालक बनत नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. रस्ते हे सर्वांचे आहेत, आणि त्यांची योग्य काळजी घेणे ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. वाहतूक कोंडी ही केवळ 'कोंडी' नसून शहरांच्या विकासाला अडथळा ठरणारी गंभीर समस्या आहे. वेळ आली आहे ती या समस्येकडे प्राथमिकतेने पाहण्याची. शिस्त, नियोजन आणि सामूहिक प्रयत्न यांच्या जोरावरच आपण वाहतूक कोंडी या भीषण समस्येला प्रभावीपणे कमी करू शकतो. त्यासाठी नियोजन महत्वाचे आहे, सरकारी कार्यालयाचा ताळमेळ नाही. त्रस्त मात्र सामान्य माणूस कसलं स्मार्ट सिटी हे....!!

# वैद्यकीय उपचाराचा बनाव

## डोंबिवलीतील व्यावसायिकाची फसवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - मी रुग्णालयात उपचार घेत आहे. मला सीटी स्कॅन करायचे आहे. मला तातडीने पैशाची गरज आहे. मी तुमच्या बँक खात्यात पैसे पाठवितो. ते पैसे तुम्ही मला ऑनलाईन माध्यमातून क्युआर कोड स्कॅन करून परत पाठवा, असे डोंबिवलीतील एका व्यावसायिकाला एका इसमाने फोन करून सांगितले. व्यावसायिकाने तातडीने संबंधिताला ऑनलाईन माध्यमातून पैसे पाठविले. त्यानंतर संपर्क करणाऱ्या इसमाने आपली फसवणूक केली असल्याचे समजल्यावर व्यावसायिकाने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

डोंबिवली पूर्वेतील नांदिवली भागात विजय गजरा हे व्यावसायिक राहतात. ते कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीत किरकोळ विक्रेते म्हणून करतात. गेल्या महिन्यात तक्रारदार विजय गजरा यांना एका इसमाने संपर्क केला. मी दीपुभाई मोरेनावाला बोलत आहे. मला सेव्हन हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. मला तातडीने सीटी स्कॅन करायचे आहे. मला तातडीने पैशांची गरज आहे. मी तुम्हाला ३८ हजार रूपये ऑनलाईन माध्यमातून पाठवितो. त्यानंतर मी तुम्हाला माझा आर्थिक व्यवहाराचा क्युआर कोड पाठवितो. त्यावर तुम्ही मला मी पाठविलेले पैसे पाठवा, असे सांगितले.

दीपुभाई मोरेनावाला यांनी डोंबिवलीतील व्यावसायिकाला ३८ हजार रूपये ऑनलाईन माध्यमातून पाठविल्याचे लघुसंदेश पाठविले. आपल्या बँक खात्यात दीपुभाई यांचे पैसे जमा झाले म्हणून व्यावसायिकाने दीपुभाई यांनी पाठविलेल्या क्युआर कोडच्या माध्यमातून त्यांना अठरा हजार रूपये पाठविले. दीपुभाई यांना पैशाची तातडीने गरज असल्याने आणि त्यांनी स्वताहून संपर्क केल्याने विजय गजरा यांना आपली फसवणूक होत आहे असा संशय आला नाही. १० हजार रूपये दीपुभाई यांना पाठविल्यानंतरही दीपुभाई मोरेनेवाला व्यावयासिकाला सतत संपर्क करून उर्वरित पैसे पाठविण्याची मागणी करत होते.

त्यानंतर विजय गजरा यांना संशय आला म्हणून त्यांनी आपल्या बँक खात्यात दीपुभाई मोरेनावाला यांनी पैसे पाठविलेत आहेत का याची खात्री केली तेव्हा त्यांना ते पैसे आपल्या बँक खात्यात जमा झाले नाहीत, असे लक्षात आले. दीपुभाई यांनी आपणास पैसे जमा झाल्याचे बनावट लघुसंदेश पाठवून आपली फसवणूक केली. आणि आपल्याकडून अठरा रूपये खोटे सांगून उकळले आहेत. आपली फसवणूक झाल्याने व्यावसायिक विजय गजरा यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



## सावरोलीच्या भेरे दांपत्यास महापुजेचा मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर : कार्तिकी एकादशी निमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७२९ व्या संजीवन समाधी सोहळया निमित्त महापुजेचा मान माऊलींच्या कृपेने शहापूर तालुक्यातील श्री. शंकर गणू भैरे व सौ. निर्मला शंकर भेरे (रा. सावरोली बुद्रुक ता. शहापूर) या दांपत्यास मिळाला.**

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सुशोभिकरण

## ॲड प्रशांत चंदनशिव यांच्या प्रयत्नांना यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगर ४ पूर्व सुभाष टेकडी येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णकृती पुतळा उभारण्यात आला असून पुतळ्याचा रंग निघू लागले होते समाजसेवक अभिजीत चंदनशिव, शेखर दळवी ह्यांनी ॲड प्रशांत भानुदास चंदनशिव ह्यांचा सोबत चर्चा करून महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. धीरज चव्हाण ह्यांना लेखी तक्रार पाठवली

सदर पत्राची पालिकेने तातडीने दखल घेत दिनांक १५/११/२०२५ रोजी पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाला नव्याने परत रंग लावण्यात येत असून ह्या रंगाचे ३ प्रकारे शेड दिसून येतील ... तसेच पुतळयाला रंगकरून पुर्णकृती पुतळ्याच्या खालच्या बाजूला रेलिंग लावण्यात येणार असून अजून ही उर्वरित कामे करून घेण्यात येणार आहे.

# दिव्यात चाळीची गॅलरी कोसळली

## अग्निशमन दलाकडून ३० व्यक्तींची सुटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कळवा, ता. १६ (बातमीदार)** : दिव्यातील दिवा महोत्सव मैदानाजवळील एका जुन्या दुमजली चाळीची गॅलरी कोसळल्याची घटना शनिवारी (ता. १५) रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत अडकलेल्या सुमारे ३० व्यक्तींची अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने सुखरूप सुटका केली.

दिव्यातील दिवा महोत्सव मैदानाजवळ असलेली सावळाराम स्मृती नावाची दुमजली चाळ आहे. ही चाळ सुमारे २० ते २५ वर्षे जुनी असून, त्यात २१ सदनिका आहेत. साधारण ५० ते ५५ व्यक्ती या चाळीत राहत होत्या. शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास अचानक पहिल्या मजल्यावरील गॅलरी कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. दिवा अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर अडकलेल्या ३० जणांना शिडीच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढले. कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, महापालिका प्रशासनाने ही चाळ धोकादायक म्हणून घोषित केली आहे. चाळीतील सर्व रहिवासीयांना सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांच्या नातेवाईकांकडे स्थलांतरित करण्यात आले आहे.

# शरद पवार गटाचे टिटवाळा शहर अध्यक्ष मोरेश्वर तरेंसह असंख्य कार्यकर्ते भाजपात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा : राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे टिटवाळा शहर अध्यक्ष मोरेश्वर तरे व असंख्य टिटवाळा येथील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षा मध्ये जाहीर प्रवेश केला आहे,गेल्या अनेक वर्षांपासून एकनिष्ठ असलेले मोरेश्वर तरे यांनी आपल्या कामाचा ठसा टिटवाळा परिसरात उमटविला आहे,जनतेती विविध कामे केली आहेत,आड आडचणीला धावून जात आहेत, जनतेचा विकास झाला पाहिजे या उद्देशाने मोरेश्वर तरे यांनी जाहीर प्रवेश केला आहे,**



कल्याण येथील कार्यक्रमाला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण माजी आमदार नरेंद्र पवार, जिल्हा अध्यक्ष नंदु परब, माजी अध्यक्ष नरेंद्र सुयैवंशी, माजी नगरसेवक संतोष तरे, अजुन भोईर, सचिन खेमा,शोभा पाध्ये, संतोष केले,जुने कल्याण शहर अध्यक्ष अमित धाक्रस, शत्रुघ्न भोईर, प्रशांत माळी, मांडा टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तीवान भोईर यांच्या सह भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, मोरेश्वर तरे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले असंख्य कार्यकर्ते भाजप मध्ये सहभागी झाले आहेत.

## भाजपात प्रवेश झालेल्या कार्यकर्त्यांची नावे

**त्या मध्ये सुहास कांबळे, हेमंत परटोले,अमर राजभोग, कमलेश नांगरे, संतोष सिंग, मनोज कणेरी, संदिप गवारी, भास्कर मोरे,पकंज शेलके, सुनील भोईर, कुमार वारघडे, नित्यानंद त्रिपाठी, शैलेश त्रिपाठी, संदिप धुमाळ,जमीळ शेख, राजेश जाधव, रोहित दुबे,राजु पाठक, सरदार राठोड, सुभाष रसाळ, लावण्या कांबळे, कविता अडळ,रक्षिता जाधव,विनिता सुवै, सुनंदा भांगरे यांच्या सह टिटवाळा परिसरातील असंख्य कार्यकर्ते यांनी भाजप मध्ये प्रवेश केला आहे,**

# छावा संघटनेच्या वतीने वावोशी येथे विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व शिक्षक गुणगौरव सोहळा कार्यक्रमाचे आयोजन वावोशी फाटा येथील जेष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आले. हा कार्यक्रम शैक्षणिक वर्ष 2025 मध्ये उत्तीर्ण झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सत्कार आणि त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा राबविण्यात आला. या कार्यक्रमाला छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटना संस्थापक अध्यक्ष सुनील भोर, जिल्हाध्यक्ष तानाजी शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, अश्विनी ठाकूर, गणेश मोरे, भूषण पाटील, महेश पाटील, भगवान ढेबे, मनीष हातनोलकर, गावित सर, विद्या घरत, मानसी केदारे, शर्मिला मिसाळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.शिक्षक बांधवांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

# भविष्यवेध



**सोमवार**
**17 नोव्हेंबर 2025**

**मेष**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**वृषभ**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**मिथुन**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**कर्क**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**सिंह**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**कन्या**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**तुळ**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**वृश्चिक**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**धनु**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**मकर**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थीच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**कुंभ**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**मिन**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**जीवनदीप कॉलेज,खर्डी**
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# अंबरनाथमध्ये 'राजकीय भूकंप'

## वाळेकर गटासह काँग्रेस गटाचा भाजपमध्ये प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. १६ (वार्ताहर) : अंबरनाथच्या स्थानिक राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गट आणि काँग्रेस पक्षातील प्रमुख नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश करीत मोठे शक्तिप्रदर्शन केले.**

शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का देत जिल्हा संघटक मीना सुरेश वाळेकर, युवानेता पवन वाळेकर, युवासेना संघटक चंद्रकांत मोटे, युवा अधिकारी आकाश वाळेकर, प्रकाश वाकुंज आणि रवींद्र पवार यांसह अनेक महिला कार्यकर्त्यांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करीत भाजपचा झेंडा हाती घेतला. यासोबतच काँग्रेस पक्षातील बबलू सिंग आणि लक्ष्मीकांत सिंग यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि समर्थकांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत डोंबिवली येथे हा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला. हजारो महिला कार्यकर्त्यांनी या वेळी भाजपमध्ये प्रवेश केला. या घडामोडीमुळे अंबरनाथमधील राजकीय समीकरणांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. आगामी नगर परिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला यामुळे मोठा धक्का बसण्याची चर्चा आहे, तर भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**■ तेजश्री करंजुले यांना बळ**

भाजपकडून नगराध्यक्ष पदासाठी मैदानात असलेल्या तेजश्री विश्वजीत करंजुले यांना या पक्षप्रवेशाचा मोठा फायदा होणार आहे. शिवसेना आणि काँग्रेसमधील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने करंजुले यांची ताकद आणखी भक्कम झाल्याचे मानले जात आहे. लोकनेते गुलाबराव करंजुले पाटील यांनी आगामी निवडणुकीत भाजप अंबरनाथमध्ये मोठे यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला.

### १० हजार चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त

# पनवेलमधील अतिक्रमणांवर सिडकोची धडक कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल (वार्ताहर) :** कामोठे सेक्टर-४ मधील जागेमध्ये बेकायदेशीररीत्या भराव करून त्यावर अनधिकृतरीत्या बांबूरोड, गॅरेज, नर्सरी आणि बांधकाम साहित्याची दुकाने उभारून जागा हडप करण्याचा भूमाफियांचा प्रयत्न सिडकोने हाणून पाडला. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने आणि कामोठे पोलिसांनी या अतिक्रमणावर संयुक्तरीत्या कारवाई करून सुमारे १० हजार चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त केले आहे. कामोठेतील जुई रेसिडेन्सी समोरील सर्व्हे क्रमांक ८४, ८४-३, ८४-४ आणि ८४-५ या ना-विकास क्षेत्रावर भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात भराव टाकून त्या ठिकाणी अनधिकृतरीत्या बांबूरोड, गॅरेज, नर्सरी आणि बांधकाम साहित्याची दुकाने उभारण्यात आली होती.

भूमाफियांनी सिडकोकडून कोणतीही अधिकृत परवानगी न घेता या जागेचा व्यावसायिक वापर सुरू करून त्याची विक्री करण्याचे प्रयत्न सुरू केले होते.

हा प्रकार कामोठेतील काही जागरूक नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर या जागरूक नागरिकांनी सामाजिक संघटनेच्या प्रतिनिधींसह सिडकोच्या दक्षता विभागाचे प्रमुख सुरेश मेंगडे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे याविषयी तक्रार केली होती. या तक्रारीनंतर सिडको अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केली असता, भूमाफियांनी सिडकोची जागा बळकावण्यास सुरुवात केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने आणि कामोठे पोलिसांनी येथील अतिक्रमणावर संयुक्तरीत्या कारवाई करून तीन बांबूशेड, एक गॅरेज, एक नर्सरी आणि बांधकाम साहित्याची दुकाने जमीनदोस्त केली. तसेच भूमाफियांनी अतिक्रमण केलेले सुमारे १० हजार चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त केले.

# विकासाची दृष्टी रुजवण्यासाठी आज होणार 'सरपंच संवाद'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्यातील गावोगावी विकासाची नवी दृष्टी रुजवण्यासाठी राज्य शासनाने 'सरपंच संवाद' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता ठाणे जिल्ह्यासह राज्यातील सर्व सरपंचांशी थेट संवाद साधणार आहेत. याबाबतचे निर्देश ठाणे जिल्हा परिषदेला शुक्रवारीच राज्य शासनाकडून प्राप्त झाले आहेत.

ठाणे जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांनी आजपासून 'सरपंच संवाद' हा महत्त्वाकांक्षी उपक्रमाची तयारी आदेशानुसार सुरू केली आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, यांनी स्वतः उपस्थित राहूनजिल्ह्यातील सर्व ४३१ ग्राम पंचायतींच्या सरपंचांपर्यंत माहिती पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. या संवादात सहभागासाठी क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (क्यूसीआय) शी सल्लामसलत करून प्रशिक्षण घेतलेल्या एक

**ठाणे जिल्ह्यासह राज्यातील सर्व सरपंचांशी आज मुख्यमंत्र्यांचा संवाद**

किंवा दोन सरपंचांची निवड करण्यात येणार आहे. त्यांना जिल्हा परिषद ठाणे यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यास सांगितले आहे. यामुळे ठाणे जिल्ह्यातील सरपंचांना प्रस्थापित केलेल्या कामाबद्दल राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वासमोर मते मांडण्याची अभूतपूर्व संधी डिजिटल, ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध झाली आहे.

या कार्यक्रमाच्या संरचनेनुसार 'क्यूसीआय'द्वारे दिलेल्या सरपंच संवाद प्रशिक्षणाचा उद्देश आणि त्यातून ग्रामविकासात निर्माण होणाऱ्या सकारात्मक बदलांची चर्चा होणार आहे. राज्यातील सहा महसूल विभागांमधील निवडलेल्या सरपंचांचे एक ते दोन मिनिटांचे अभिप्राय मुख्यमंत्र्यांना थेट सादर केले जातील. ठाणे जिल्ह्यातील निवडलेल्या सरपंचांचे नाव क्यूसीआय मार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

# उल्हासनगर : खड्डे भरण्यासाठी अतिरिक्त आयुक्त मैदानात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगरात रस्त्यातील खड्ड्या विरोधात सर्वच पक्ष नेत्यांनी आवाज उठविल्यावर, रस्त्यातील खड्डे भरण्याचे संकेत आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिले होते. रस्त्यातील खड्ड्याची पाहणी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त धीरज चव्हाण हे आता मैदानात उतरले. त्यांनी बुधवारी शहर पूर्वेतील श्रीराम चौक, पवई चौक, कैलास कॉलनी, मच्छी मार्केट, तहसील रस्ता आदी रस्त्याची पाहणी केली. अतिरिक्त आयुक्त चव्हाण यांच्या रस्ते पाहणीनंतर संध्याकाळी रस्ते दूरस्तीचे काम सुरू झाले.

रस्ता दूरस्ती व रस्ते खड्यावरून आयुक्ताना कोंडीत पकडण्याचा अनेकदा प्रयत्न झाला. आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी रस्ते सुसाट करण्यासाठी निविदा विना रस्ते दुरस्तीचे काम दिवाळी सणा दरम्यान सुरू केले. रस्ते बऱ्या पैकी सुसाट झाल्यावर, शहर पूर्वेतील रस्ते खड्ड्याचा प्रश्न ऐरणीवर आला. दरम्यान, रस्त्यातील खड्डे भरण्यासाठी अतिरिक्त आयुक्त धीरज चव्हाण हे मैदानात उतरल्याचे चित्र आहे. चव्हाण यांनी शहर पूर्वेतील रस्त्याची पाहणी केल्यानंतर, काही तासात रस्ते दूरस्तीला सुरवात झाली.

महापालिकेने पावसाळ्यात रस्ते दूरस्तीसाठी अडीच कोटीची तरतूद केल्याची माहिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली होती. त्यानंतर दिवाळी दरम्यान रस्ते दूरस्तीवरील खर्च गुलदस्त्यात असून पुन्हा तिसऱ्या टप्प्यात रस्ते दूरस्ती सुरू केल्याचे बोलले जात आहे. पावसाळ्या पासून आज प्रयत्न रस्ते दूरस्ती व रस्ते खड्डे भरण्यावर एकूण किती खर्च केला. याची माहिती पारदर्शकपणे नागरिकांना देण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे.

# "ये पब्लिक है सब जानती है"

## कल्याण डोंबिवली महापौर पदावर श्रीकांत शिंदे यांचा फिल्मी अंदाज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेत आयोजित विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव 2025 कार्यक्रमात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्र आणि भव्य पुतळा उभारून कल्याणकरांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार केल्याबद्दल आयोजक मंडळातर्फे त्यांचा मानपत्र, शाल-श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या भीम महोत्सवाला मोठ्या संख्येने नागरिक, आंबेडकरी अनुयायी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि स्थानिक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे आणि प्रख्यात गायिका कडूबाई खरात यांच्या गाण्याचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार राजेश मोरे, अण्णा रोकडे, देवचंद आंबादे, समितीचे अध्यक्ष सुमेध हुमणे, अतिश गायकवाड, राजू रोकडे, शिवसेनेचे महेश गायकवाड, निलेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

**विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सवात खा. शिंदे यांचा जाहीर सत्कार**



**कार्यक्रमादरम्यान डॉ. शिंदे यांनी सामाजिक प्रबोधन, शिक्षणवाढ, तसेच डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा शहरात अधिक प्रभावी प्रचार-प्रसार करण्यासाठी पुढील काळातही विकासकामे सुरू राहतील, असे आश्वासन दिले. आगामी होऊ घातलेले महानगरपालिकेच्या निवडणुकी बाबत राजकीय चर्चांनाही या कार्यक्रमात रंग मिळाला. विरोधकांच्या टीकेवर भाष्य करताना डॉ. शिंदे यांनी ये पब्लिक है, सब जानती है कुणीही काहीही बोलो, जनता जनार्दनच ठरवणार की महापौर कुणाचा बसणार,असा फिल्मी-स्टाईल टोला लगावला. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला.**

परिशिष्ट १०

(प्रभागनिहाय प्रारुप आरक्षणाची जाहीर सूचना)

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता क्रमांक ठामपा/निवि/ आयुक्त-३६२, दिनांक ०४.१०.२०२५ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

**एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित जागांचा संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ९ | ५ |
| २ | अनुसूचित जमाती | ३ | २ |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ३५ | १८ |
| ४ | सर्वसाधारण | ८४ | ४१ |
| एकूण | | १३१ | ६६ |

**प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | अनुसूचित जमाती |
| २ | | १-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ३ | | १-क | सर्वसाधारण महिला |
| ४ | | १-ड | सर्वसाधारण |
| ५ | २ | २-अ | अनुसूचित जमाती - महिला |
| ६ | | २-ब | ना.मा.प्र. |
| ७ | | २-क | सर्वसाधारण महिला |
| ८ | | २-ड | सर्वसाधारण |
| ९ | ३ | ३-अ | अनुसूचित जाती - महिला |
| १० | | ३-ब | ना.मा.प्र - महिला |
| ११ | | ३-क | सर्वसाधारण |
| १२ | | ३-ड | सर्वसाधारण |
| १३ | ४ | ४-अ | ना.मा.प्र. |
| १४ | | ४-ब | सर्वसाधारण महिला |
| १५ | | ४-क | सर्वसाधारण महिला |
| १६ | | ४-ड | सर्वसाधारण |
| १७ | ५ | ५-अ | अनुसूचित जमाती — महिला |
| १८ | | ५-ब | ना.मा.प्र. |
| १९ | | ५-क | सर्वसाधारण महिला |
| २० | | ५-ड | सर्वसाधारण |
| २१ | ६ | ६-अ | अनुसूचित जाती - महिला |
| २२ | | ६-ब | ना.मा.प्र. - महिला |
| २३ | | ६-क | सर्वसाधारण |
| २४ | | ६-ड | सर्वसाधारण |
| २५ | ७ | ७-अ | अनुसूचित जाती - महिला |
| २६ | | ७-ब | ना.मा.प्र. - महिला |
| २७ | | ७-क | सर्वसाधारण |
| २८ | | ७-ड | सर्वसाधारण |
| २९ | ८ | ८-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ३० | | ८-ब | सर्वसाधारण महिला |
| ३१ | | ८-क | सर्वसाधारण |
| ३२ | | ८-ड | सर्वसाधारण |
| ३३ | ९ | ९-अ | अनुसूचित जाती |
| ३४ | | ९-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ३५ | | ९-क | सर्वसाधारण महिला |
| ३६ | | ९-ड | सर्वसाधारण |
| ३७ | १० | १०-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ३८ | | १०-ब | सर्वसाधारण महिला |
| ३९ | | १०-क | सर्वसाधारण |
| ४० | | १०-ड | सर्वसाधारण |
| ४१ | ११ | ११-अ | ना.मा.प्र. |
| ४२ | | ११-ब | सर्वसाधारण महिला |
| ४३ | | ११-क | सर्वसाधारण महिला |
| ४४ | | ११-ड | सर्वसाधारण |
| ४५ | १२ | १२-अ | ना.मा.प्र. |
| ४६ | | १२-ब | सर्वसाधारण महिला |
| ४७ | | १२-क | सर्वसाधारण महिला |
| ४८ | | १२-ड | सर्वसाधारण |
| ४९ | १३ | १३-अ | ना.मा.प्र. |
| ५० | | १३-ब | सर्वसाधारण महिला |
| ५१ | | १३-क | सर्वसाधारण महिला |
| ५२ | | १३-ड | सर्वसाधारण |
| ५३ | १४ | १४-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ५४ | | १४-ब | सर्वसाधारण महिला |
| ५५ | | १४-क | सर्वसाधारण |
| ५६ | | १४-ड | सर्वसाधारण |
| ५७ | १५ | १५-अ | अनुसूचित जाती |
| ५८ | | १५-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ५९ | | १५-क | सर्वसाधारण महिला |
| ६० | | १५-ड | सर्वसाधारण |
| ६१ | १६ | १६-अ | अनुसूचित जाती |
| ६२ | | १६-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ६३ | | १६-क | सर्वसाधारण महिला |
| ६४ | | १६-ड | सर्वसाधारण |
| ६५ | १७ | १७-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ६६ | | १७-ब | सर्वसाधारण महिला |
| ६७ | | १७-क | सर्वसाधारण |
| ६८ | | १७-ड | सर्वसाधारण |
| ६९ | १८ | १८-अ | ना.मा.प्र. |
| ७० | | १८-ब | सर्वसाधारण महिला |
| ७१ | | १८-क | सर्वसाधारण महिला |
| ७२ | | १८-ड | सर्वसाधारण |
| ७३ | १९ | १९-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ७४ | | १९-ब | सर्वसाधारण महिला |
| ७५ | | १९-क | सर्वसाधारण |
| ७६ | | १९-ड | सर्वसाधारण |
| ७७ | २० | २०-अ | ना.मा.प्र. |
| ७८ | | २०-ब | सर्वसाधारण महिला |
| ७९ | | २०-क | सर्वसाधारण महिला |
| ८० | | २०-ड | सर्वसाधारण |
| ८१ | २१ | २१-अ | ना.मा.प्र. |
| ८२ | | २१-ब | सर्वसाधारण महिला |
| ८३ | | २१-क | सर्वसाधारण महिला |
| ८४ | | २१-ड | सर्वसाधारण |
| ८५ | २२ | २२-अ | अनुसूचित जाती - महिला |
| ८६ | | २२-ब | ना.मा.प्र. |
| ८७ | | २२-क | सर्वसाधारण महिला |
| ८८ | | २२-ड | सर्वसाधारण |
| ८९ | २३ | २३-अ | ना.मा.प्र. |
| ९० | | २३-ब | सर्वसाधारण महिला |
| ९१ | | २३-क | सर्वसाधारण महिला |
| ९२ | | २३-ड | सर्वसाधारण |
| ९३ | २४ | २४-अ | अनुसूचित जाती - महिला |
| ९४ | | २४-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ९५ | | २४-क | सर्वसाधारण |
| ९६ | | २४-ड | सर्वसाधारण |
| ९७ | २५ | २५-अ | ना.मा.प्र. |
| ९८ | | २५-ब | सर्वसाधारण महिला |
| ९९ | | २५-क | सर्वसाधारण महिला |
| १०० | | २५-ड | सर्वसाधारण |
| १०१ | २६ | २६-अ | ना.मा.प्र. - महिला |
| १०२ | | २६-ब | सर्वसाधारण महिला |
| १०३ | | २६-क | सर्वसाधारण |
| १०४ | | २६-ड | सर्वसाधारण |
| १०५ | २७ | २७-अ | ना.मा.प्र. |
| १०६ | | २७-ब | सर्वसाधारण महिला |
| १०७ | | २७-क | सर्वसाधारण महिला |
| १०८ | | २७-ड | सर्वसाधारण |
| १०९ | २८ | २८-अ | अनुसूचित जाती |
| ११० | | २८-ब | ना.मा.प्र. - महिला |
| १११ | | २८-क | सर्वसाधारण महिला |
| ११२ | | २८-ड | सर्वसाधारण |
| ११३ | २९ | २९-अ | ना.मा.प्र. - महिला |
| ११४ | | २९-ब | सर्वसाधारण महिला |
| ११५ | | २९-क | सर्वसाधारण |
| ११६ | ३० | ३०-अ | ना.मा.प्र. |
| ११७ | | ३०-ब | ना.मा.प्र. - महिला |
| ११८ | | ३०-क | सर्वसाधारण महिला |
| ११९ | | ३०-ड | सर्वसाधारण |
| १२० | ३१ | ३१-अ | ना.मा.प्र. |
| १२१ | | ३१-ब | सर्वसाधारण महिला |
| १२२ | | ३१-क | सर्वसाधारण महिला |
| १२३ | | ३१-ड | सर्वसाधारण |
| १२४ | ३२ | ३२-अ | ना.मा.प्र. |
| १२५ | | ३२-ब | सर्वसाधारण महिला |
| १२६ | | ३२-क | सर्वसाधारण महिला |
| १२७ | | ३२-ड | सर्वसाधारण |
| १२८ | ३३ | ३३-अ | ना.मा.प्र. |
| १२९ | | ३३-ब | ना.मा.प्र. - महिला |
| १३० | | ३३-क | सर्वसाधारण महिला |
| १३१ | | ३३-ड | सर्वसाधारण |

दि.१७.११.२०२५ रोजीच्या जाहीर सूचनेत नमूद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या दि. १७.११.२०२५ ते दि. २४.११.२०२५ या कालावधीत महानगरपालिका मुख्यालय, निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/८७६/२०२५-२६
दि:१७.११.२०२५

सही/-
सौरभ राव, भाप्रसे
प्रशासक तथा आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**Pls visit our official web-site**
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

# 'पुलीस को उडा दे..'

## भिवंडीत कत्तलीसाठी गायी नेणाऱ्यांकडून पोलिसांच्या अंगावरून गाडी नेण्याचा प्रयत्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कत्तलीसाठी गायी नेणाऱ्या टोळीला अडविण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांच्या अंगावरून गाडी नेण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भिवंडीतील पडघा पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्न प्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी थरारकरित्या पाठलाग करुन यातील वाहन चालकाला ताब्यात घेतले आहे. तर इतरांचा पोलीस शोध घेत आहेत.

पडघा पोलीस ठाण्याचे कर्मचारी १४ नोव्हेंबरला गस्त घालत असताना काहीजण कत्तलीसाठी गायी नेत असल्याची माहिती प्राप्त झाली. यानंतर कोशिंबे फाटा येथे नाकाबंदी सुरु करुन वाहनांची तपासणी करत वाहने सोडण्यास सुरुवात केली. पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास एक भरधाव वाहन वाशिंद येथून पडघ्याच्या दिशेने जात असल्याचे पथकाला आढळले.

पोलिसांनी त्या वाहन चालकाला हात दाखवून वाहन थांबविण्याचा इशारा केला असता, त्याने वाहनाचा वेग कमी केला. दोन पोलीस अधिकारी आणि दोन कर्मचारी तेथे आले. कर्मचारी वाहनाच्या पुढे थांबले होते. तर अधिकारी वाहनाच्या मागील भागात काय आहे याची पाहणी करण्यास जात होते. त्याचवेळी वाहनाच्या मागून दुचाकीस्वार आला.



'पुलीस को उडा दे..' असे म्हणताच, त्या वाहन चालकाने वेगाने त्याचे वाहन चालविले. प्रसंगावधान राखत पोलीस कर्मचारी बाजूला झाल्याने त्यांचा जीव वाचला. त्यानंतर पोलीस पथकाने त्या वाहनाचा शासकीय वाहनाने पाठलाग सुरु केला. वाहतुक कोंडी असल्याने त्या वाहन चालकाने त्याचे वाहन एका हॉटेलच्या आडोशाला उभे केले. पोलीस पथक त्याच्या मागोमाग पोहचत असताना, दुचाकीवरील व्यक्ती पुन्हा तेथे आला. त्याने पोलीस मागावर आहेत... दुचाकीवर बस.. म्हणत वाहन चालकाला सांगितले. परंतु पोलीस पोहचल्याने त्या दुचाकीस्वाराने तेथून पळ काढला. त्यामुळे त्याला दुचाकीवर बसता आले नाही.

पोलीस पथकाने वाहन चालक अक्षय पाटील (२८) याला ताब्यात घेतले. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये सात गायी आढळून आल्या. या गायी शहापूर येथून एका व्यक्तीकडून घेतल्या. त्या सुफीयानच्या मदतीने पडघ्यातील बोरीवली येथे राहणाऱ्या इम्रान मुल्ला याच्याकडे नेल्या जात असल्याची माहिती त्याने दिली.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : 04
ठाणे ■ सोमवार
17 नोव्हेंबर 2025



# बदलापूर-अंबरनाथच्या तापमानात घट



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ, ता. १६ (वार्ताहर) :** शहरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून अचानक कडाक्याची थंडी जाणवू लागली असून, तापमानात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. पहाटे लवकर आणि रात्री उशिरा जाणवणाऱ्या तीव्र थंडीमुळे नागरिक अक्षरशः कुडकुडत आहेत. या अचानक वाढलेल्या गारव्यामुळे रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणची वर्दळही कमी झाल्याचे चित्र आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार अंबरनाथ परिसरात पहाटेच्या सुमारास तापमान सरासरीपेक्षा बऱ्याच अंशांनी खाली आले असून, ते १२ ते १४ अंश सेल्सिअसच्या आसपास स्थिरावले आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याच्या लाटेमुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्याचे हवामानतज्ज्ञांचे मत आहे. डिसेंबर महिना सुरू होण्यापूर्वीच इतका तीव्र गारवा जाणवणे ही एक अनोखी बाब मानली जात आहे. शहरात थंडी वाढल्यामुळे सकाळी अनेक ठिकाणी नागरिकांनी घरासमोर शेकोट्या पेटवलेल्या दिसत आहेत. चहा-कॉफी केंद्रांवर मोठी गर्दी असून, नागरिक थंडीपासून बचावासाठी विशेषतः चहा-कॉफीसारख्या गरम पेयांना प्राधान्य देत आहेत. रिक्षाचालक आणि बांधकाम मजूर यांसारख्या बाहेरील कामगारांना या कडक थंडीमुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

## विद्यार्थ्यांची गैरसोय

**सकाळी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असून, पालकांकडून गरम कपड्यांची विशेष व्यवस्था केली जात आहे. मे महिन्यापासून सुरू असलेल्या पावसाने अखेर विश्रांती घेतली असून, थंडीची सुरुवात झाल्याने हा गारवा सुखकारक वाटत असला तरी, आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस असाच गारवा राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे.**

# वाशाळा परिसरात बिबट्याचा संचार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर, ता. १६ (वार्ताहर) : शहापूर तालुक्यातील वाशाळा वनपरिक्षेत्र हद्दीतील जंगल भागात मुक्त वावर करणारा बिबट्या आता गावागावांत फिरून कुत्रा, कोंबड्या, शेळी, गाय, बैलांची शिकार करू लागला आहे. त्यामुळे भात, नाचणी, वरईचे पीक काढण्यासाठी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांसह ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.**

## नागरिकांना सतर्कतेचा इशारा

वाशाळा वनपरिक्षेत्र हद्दीतील पाटोळ, कोळीवाडा गावांच्या परिसरात सतत आठ दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार आढळून आला आहे. येथील दामू धोकटे, एकनाथ शिद या शेतकऱ्यांच्या शेळयांची बिबट्याने शिकार केल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाकडे पिंजऱ्याची मागणी केल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी एकनाथ रोंगटे यांनी सांगितले. जनावरांची शिकार होऊ नये, यासाठी येथे गावकरी दिवस रात्र पहारा देऊन रात्री फटाके वाजवून बिबट्याला पळवून लावण्याचे प्रयत्न करीत आहेत. याबाबत जनजागृती मोहीम हाती घेतली असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिल्याचे वनपाल मुकेश भोईर यांनी सांगितले.

# जेष्ठ नागरिकांनी आपले अवयव जपा!

## आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण(प्रतिनिधी)**

आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील पेण(प्रतिनिधी) जेष्ठ नागरिक नोकरीतून निवृत्त झाले की ,अथवा शेतकरी, कामगार यांची मुले मोठी होउन नोकरीस लागलेली आपल्या आई-वडील यांना आराम व नातवंड यांना सांभाळत रहा असा गोड सल्ला देतात. मात्र जेष्ठ पुरुषास बाजारहाट, मच्छी, भाजी मार्केटला जावे लागते त्या साठी दोन चाकी तर व्यायाम म्हणून सायकल घेऊन अनेक जण जातात, अशा वेळेस हमरस्त्यावर जोराने आणी वेडी वाकडी चालविणारी तरुण पिढी कडे रस्त्याच्या पलिकडे जाताना कायम दुतर्फा लक्ष ठेवावे, आपली सायकल अथवा दुचाकी ओळखीच्या ठिकाणी ठेवून रस्त्यावरून जाताना आपला उजवा हात समोर दाखवून सावकाश रस्ता ओलांडून जावे,म्हणजे अपघाताला सामोरे जावु नये असा मोलाचा संदेश आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील यांनी दिला आहे.

घरात कितीही मागे लागलेली नात अथवा नातु यांनी आजोबा,आजीने सोबत नेऊ नये,छोटी मुले आपले ऐकत नाहीत कसेही धावतात त्या मुळे अनेक अपघात झाले आहेत, आणी अश्या घटनेमुळे चांगल्या आनंदी संसारात सासु -सुन,मुलगा,वडील यांच्यात कायम दरी निर्माण होईल.

आजीनी सुध्दा लहान मुलांवर काटेकोर लक्ष दिले पाहिजेत, आपले मोबाईल अजिबात लहान मुलांना राग आलातरी देऊ नये.मुलांचे आई-वडील घरात येईपर्यंत लक्ष ठेवून आपल्या जबाबदारी तुन मोकळे व्हावे, आपल्या औषधाच्या गोळया आपणच घ्याव्या, नात अथवा नातु देतो म्हणून खावू नका प्रेमापोटी घेऊन त्या अदलाबदल झाल्यास रुग्णालयात दाखल होण्याची आपत्ती येऊ शकेल. जेष्ठ नागरिकास आनंदाच्या बातम्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खास करून औषधोपचार साठी योजना राबवणार असुन यामधे 65वर्षावरील जेष्ठ नागरिक महीना 3000रुपये देण्यात येणार आहेत, वैद्यकीय उपकरण खरेदीवर अनुदान, तीर्थक्षेत्रांना जाण्यास अनुदान, 70वर्षावरील जेष्ठाना केंद्र सरकार च्या आयुष्यमान भारत योजनेत समाविष्ट केले जाईल. यासाठी जेष्ठ मित्र मैत्रीणीनो घरात आणी बाहेर पडताना आपल्या अवयवाची कायम काळजी घेऊन सुरक्षित रहा .महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार दिलेल्या योजनेचा लाभ जेष्ठ नागरिकांनी घ्यावा याबद्दल महाराष्ट्र शासनाचे हार्दिक अभिनंदन करतो असेही जेष्ठ पत्रकार प्रा.डॉ.जयपाल पाटील, आपत्तीव्यवस्थापन तज्ञ अलिबाग यांनी सांगितले.




# 'नेत्र रक्षा – डायबेटीस आय अवेअरनेस वॉक' ला हजारो डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शरद शहाणे : डोंबिवली, दि. १६**

अनिल आय हॉस्पिटल, महाराष्ट्र ऑप्थॅल्मॉलॉजिकल सोसायटी (MOS), IMA डोंबिवली आणि डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नेत्र रक्षा – A Walk for Diabetes Eye Awareness' या भव्य रॅलीला डोंबिवलीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सुमारे १५०० नागरिकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय श्री. रविंद्रजी चव्हाण – आमदार, प्रदेशाध्यक्ष (भाजपा) यांनी उपस्थित राहून सर्व नागरिकांना आवाहन केले की,

"नियमित डोळ्यांची तपासणी करून डोंबिवलीला ब्लाइंड-फ्री शहर बनवण्याच्या या उपक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा."

तसेच त्यांनी अनिल आय हॉस्पिटलच्या या जनजागृती उपक्रमाचे विशेष कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे डोंबिवली आरोग्यदृष्ट्या सक्षम होत असल्याचे सांगितले.

अनिल आय हॉस्पिटलच्या संचालिका व महाराष्ट्र ऑप्थॅल्मॉलॉजिकल सोसायटी (MOS) चे अध्यक्षा डॉ. अनघा हेरूर यांनी सांगितले की,

"प्रत्येक डायबेटीक रुग्णाने दर वर्षी किमान एकदा डायबेटीक रेटिनोपॅथीची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. उशिरा निदान झाल्यास दृष्टी गमावण्याचा धोका वाढतो." तसेच त्यांनी नागरिकांना आजाराबद्दल जागरूक राहण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी महाराष्ट्र ऑप्थॅल्मॉलॉजिकल सोसायटी (MOS) तर्फे राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी भव्य 'बाल नेत्र रक्षा अभियान' जाहीर करण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये विस्तृत नेत्र तपासणी मोहीम राबवली जाणार आहे.

या रॅलीमध्ये डोंबिवलीतील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी, डोंबिवली क्लस्टर कॉलेज ३४, रोटरी व रोटरॅक्ट क्लब्स, ज्येष्ठ डायबेटॉलॉजिस्ट, IMA डॉक्टर, तसेच अनेक सामाजिक संस्था आणि शेकडो डोंबिवलीकरांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमात डॉक्टर विजय चिंचोलेहे आय एम ए प्रेसिडें (IMA ) (डोंबिवली), श्री किशोर मानकामे, डॉ. सुषिला विजयकुमार, श्री प्रभू कापसे, श्री भाई पानवडीकर यांचीही विनम्र उपस्थिती लाभली. नागरिकांच्या या मोठ्या प्रतिसादामुळे रॅलीला भव्य स्वरूप प्राप्त झाले असून, हा उपक्रम डोंबिवलीला 'ब्लाइंड-फ्री सिटी' करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे आयोजकांनी सांगितले. आगामी काळातही अशा जनजागृतीद्वारे नागरिकांचे डोळे आणि आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे अनिल आय हॉस्पिटलतर्फे सांगण्यात आले.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)**

**परिशिष्ट- १०**

**(प्रभागनिहाय प्रारुप आरक्षण प्रसिध्दी जाहिर सूचना)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता क्रमांक: रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.११/का-५, दि. ०१ ऑक्टोबर, २०२५ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील

**एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकुण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १२ | ६ |
| २ | अनुसूचित जमाती | ३ | २ |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ३२ | १६ |
| ४ | सर्वसाधारण | ७५ | ३७ |
| | **एकुण** | **१२२** | **६१** |

**प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २ | | १-ब | सर्वसाधारण महिला |
| ३ | | १-क | सर्वसाधारण महिला |
| ४ | | १-ड | सर्वसाधारण |
| ५ | २ | २-अ | अनुसूचित जाती |
| ६ | | २-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७ | | २-क | सर्वसाधारण महिला |
| ८ | | २-ड | सर्वसाधारण |
| ९ | ३ | ३-अ | अनुसूचित जाती |
| १० | | ३-ब | अनुसूचित जमाती महिला |
| ११ | | ३-क | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| १२ | | ३-ड | सर्वसाधारण |
| १३ | ४ | ४-अ | अनुसूचित जाती महिला |
| १४ | | ४-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| १५ | | ४-क | सर्वसाधारण महिला |
| १६ | | ४-ड | सर्वसाधारण |
| १७ | ५ | ५-अ | अनुसूचित जाती |
| १८ | | ५-ब | अनुसूचित जमाती |
| १९ | | ५-क | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| २० | | ५-ड | सर्वसाधारण महिला |
| २१ | ६ | ६-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २२ | | ६-ब | सर्वसाधारण महिला |
| २३ | | ६-क | सर्वसाधारण महिला |
| २४ | | ६-ड | सर्वसाधारण |
| २५ | ७ | ७-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| २६ | | ७-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २७ | | ७-क | सर्वसाधारण महिला |
| २८ | | ७-ड | सर्वसाधारण |
| २९ | ८ | ८-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ३० | | ८-ब | सर्वसाधारण महिला |
| ३१ | | ८-क | सर्वसाधारण महिला |
| ३२ | | ८-ड | सर्वसाधारण |
| ३३ | ९ | ९-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ३४ | | ९-ब | सर्वसाधारण महिला |
| ३५ | | ९-क | सर्वसाधारण महिला |
| ३६ | | ९-ड | सर्वसाधारण |
| ३७ | १० | १०-अ | अनुसूचित जाती महिला |
| ३८ | | १०-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ३९ | | १०-क | सर्वसाधारण महिला |
| ४० | | १०-ड | सर्वसाधारण |
| ४१ | ११ | ११-अ | अनुसूचित जाती महिला |
| ४२ | | ११-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ४३ | | ११-क | सर्वसाधारण |
| ४४ | | ११-ड | सर्वसाधारण |
| ४५ | १२ | १२-अ | अनुसूचित जाती महिला |
| ४६ | | १२-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ४७ | | १२-क | सर्वसाधारण |
| ४८ | | १२-ड | सर्वसाधारण |
| ४९ | १३ | १३-अ | अनुसूचित जाती |
| ५० | | १३-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ५१ | | १३-क | सर्वसाधारण महिला |
| ५२ | | १३-ड | सर्वसाधारण |
| ५३ | १४ | १४-अ | अनुसूचित जाती महिला |
| ५४ | | १४-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ५५ | | १४-क | सर्वसाधारण |
| ५६ | | १४-ड | सर्वसाधारण |
| ५७ | १५ | १५-अ | अनुसूचित जाती महिला |
| ५८ | | १५-ब | अनुसूचित जमाती महिला |
| ५९ | | १५-क | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ६० | | १५-ड | सर्वसाधारण |
| ६१ | १६ | १६-अ | अनुसूचित जाती |
| ६२ | | १६-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ६३ | | १६-क | सर्वसाधारण महिला |
| ६४ | | १६-ड | सर्वसाधारण |
| ६५ | १७ | १७-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ६६ | | १७-ब | सर्वसाधारण महिला |
| ६७ | | १७-क | सर्वसाधारण |
| ६८ | | १७-ड | सर्वसाधारण |
| ६९ | १८ | १८-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७० | | १८-ब | सर्वसाधारण महिला |
| ७१ | | १८-क | सर्वसाधारण |
| ७२ | | १८-ड | सर्वसाधारण |
| ७३ | १९ | १९-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७४ | | १९-ब | सर्वसाधारण महिला |
| ७५ | | १९-क | सर्वसाधारण |
| ७६ | | १९-ड | सर्वसाधारण |
| ७७ | २० | २०-अ | अनुसूचित जाती |
| ७८ | | २०-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७९ | | २०-क | सर्वसाधारण महिला |
| ८० | | २०-ड | सर्वसाधारण |
| ८१ | २१ | २१-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ८२ | | २१-ब | सर्वसाधारण महिला |
| ८३ | | २१-क | सर्वसाधारण महिला |
| ८४ | २२ | २२-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ८५ | | २२-ब | सर्वसाधारण महिला |
| ८६ | | २२-क | सर्वसाधारण महिला |
| ८७ | | २२-ड | सर्वसाधारण |
| ८८ | २३ | २३-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ८९ | | २३-ब | सर्वसाधारण महिला |
| ९० | | २३-क | सर्वसाधारण महिला |
| ९१ | | २३-ड | सर्वसाधारण |
| ९२ | २४ | २४-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ९३ | | २४-ब | सर्वसाधारण महिला |
| ९४ | | २४-क | सर्वसाधारण महिला |
| ९५ | | २४-ड | सर्वसाधारण |
| ९६ | २५ | २५-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ९७ | | २५-ब | सर्वसाधारण महिला |
| ९८ | | २५-क | सर्वसाधारण |
| ९९ | २६ | २६-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| १०० | | २६-ब | सर्वसाधारण महिला |
| १०१ | | २६-क | सर्वसाधारण महिला |
| १०२ | | २६-ड | सर्वसाधारण |
| १०३ | २७ | २७-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| १०४ | | २७-ब | सर्वसाधारण महिला |
| १०५ | | २७-क | सर्वसाधारण |
| १०६ | | २७-ड | सर्वसाधारण |
| १०७ | २८ | २८-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| १०८ | | २८-ब | सर्वसाधारण महिला |
| १०९ | | २८-क | सर्वसाधारण महिला |
| ११० | | २८-ड | सर्वसाधारण |
| १११ | २९ | २९-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ११२ | | २९-ब | सर्वसाधारण महिला |
| ११३ | | २९-क | सर्वसाधारण |
| ११४ | | २९-ड | सर्वसाधारण |
| ११५ | ३० | ३०-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ११६ | | ३०-ब | सर्वसाधारण महिला |
| ११७ | | ३०-क | सर्वसाधारण |
| ११८ | | ३०-ड | सर्वसाधारण |
| ११९ | ३१ | ३१-अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| १२० | | ३१-ब | सर्वसाधारण महिला |
| १२१ | | ३१-क | सर्वसाधारण महिला |
| १२२ | | ३१-ड | सर्वसाधारण |

दि. ०८/११/२०२५ रोजीच्या जाहिर सूचनेत नमूद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या दि. १७/११/२०२५ ते २४/११/२०२५ या कालावधीत विशेष निवडणूक कक्ष, महापालिका भवन, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, तळ मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे सादर कराव्यात.

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/६७०**
**दिनांक : १४/११/२०२५**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024